# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, सोलापूर

(गृह शाखा)

दुरध्वनी क्रमांक - 0217- 2731020 ई मेल - dcbsolapur@gmail.com

वाचा:- १. या कार्यालयाचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश जा.क्र.२०२१/डिसीबी-०२/आरआर-४२४५, दिनांक ०८.०९.२०२१.

२. गृह विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र.आरएलपी-०६२१/प्र.क्र.१४४/विशा १ ब, दि. ०८.०९.२१

---

जा.क्र. २०२१/डिसीबी/०२/आरआर/ ४२७५ दिनांक :- ०९/०९/२०२१

**विषय :- सार्वजनिक गणेशोत्सव २०२१ मार्गदर्शक सूचना**
**फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ नुसार सोलापूर जिल्ह्यात कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत.**

**सुधारीत आदेश :-**

ज्याअर्थी, कोविड-१९ मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता या वर्षीचा गणेशोत्सव साध्या पद्धतीने साजरा करणेबाबत गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक २९.०६.२०२१ रोजीच्या परिपत्रकान्वये वरील वाचा क्र. १ अन्वये या कार्यालयाकडील आदेश निर्गमित केलेला आहे. तथापि, गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांनी वरील वाचा क्र. २ अन्वये शुद्धीपत्रक पारीत केलेले आहे.

त्याअर्थी, मी मिलिंद शंभरकर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (३) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार या कार्यालयाकडील वरील वाचा क्र. १ अन्वये निर्गमित केलेल्या आदेशामधील मुद्दा क्र.१० मधील " प्रत्यक्ष येऊन दर्शन घेऊ इच्छिणा-या भाविकांसाठी शारिरीक अंतराचे (फिजीकल डिस्टन्सींग) तसेच स्वच्छतेचे नियम (मास्क, सॅनीटायझर इत्यादी) पाळण्याकडे विशेष लक्ष देण्यात यावे." या ऐवजी " गणेश मुर्तीचे मुखदर्शन अथवा प्रत्यक्ष मंडपात येऊन दर्शन घेण्यास प्रतिबंध करण्यात येत असून दर्शन केवळ ऑनलाईन अथवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे उपलब्ध करुन देण्यात यावे." असे सुधारित वाचावे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती/ संस्था अथवा संघटना यांचेवर भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) कलम १८८ मधील तरतूदीनुसार दंडनिय/ कायदेशीर कारवाईस पात्र असून आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, साथ रोग नियंत्रण कायद्यातील तरतूदी आणि इतर कायदे आणि विनियम यानुसार कारवाई करणेत येईल. अशा व्यक्ती, संस्था अथवा संघटना यांचे विरुद्ध संबंधित पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांनी कारवाई करावी.

सदरचा आदेश दि. ०९.०९.२०२१ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

DISTRICT MAGISTRATE जिल्हा दंडाधिकारी सोलापूर SOLAPUR

(मिलिंद शंभरकर,भा.प्र.से.)
जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सोलापूर

**प्रत- माहितीस्तव सादर :-**

१. मा. अपर मुख्य सचिव, गृह विभाग (विशेष), मंत्रालय, मुंबई ३२
२. मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे

**प्रत - आवश्यक कार्यवाहीस्तव :-**

१. पोलीस आयुक्त, सोलापूर शहर
२. आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
३. पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर
५. अधिष्ठाता, डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर



Scanned with CamScanner

६. जिल्हा शल्यचिकित्सक, सोलापूर
७. सर्व उपविभागीय दंडाधिकारी, ---------------
८. सर्व तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी ---------------
९. सहायक कामगार आयुक्त, सोलापूर
१०. जिल्हा माहित्ती अधिकारी, सोलापूर
११. केंद्र संचालक आकाशवाणी केंद्र सोलापूर यांना प्रसिद्धीस्तव.
१२. राष्ट्रीय सुचना-विज्ञान केंद्र (NIC) जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर



Scanned with CamScanner